आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र -संध्याकाळी ७.०० वाजता

१ जून २०२४ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- देशभरात आज सातव्या टप्प्यासह लोकसभा निवडणुकीसाठीचं मतदान पूर्ण

- NDA आणि इंडिया आघाडीकडून देशात सत्ता स्थापन करण्याचा दावा

- राज्य शिक्षण मंडळाकडून दहावी आणि बारावीच्या पुरवणी परीक्षा १६ जुलैपासून

**आणि**

- शेतकऱ्यांची फसवणूक टाळण्यासाठी कृषी विभागाची राज्यभरात साडे तीनशे भरारी पथकं

**<><><><><>**

लोकसभेच्या सातव्या आणि शेवटच्या टप्प्यासाठी आठ राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशामधल्या ५७ मतदारसंघात आज मतदान पार पडलं. प्राथमिक आकडेवारीनुसार देशभरात संध्याकाळी पाच वाजेपर्यंत सरासरी ५८ पूर्णांक ३४ शतांश टक्के मतदानाची नोंद झाली आहे. बंगालमध्ये सर्वाधिक अंदाजे ७० टक्के इतकं मतदान झालं आहे. तर बिहारमध्ये सर्वात कमी अंदाजे ४९ टक्के मतदान झालं आहे.

**<><><><><>**

**इंडिया आघाडी** लोकसभा निवडणुकीत २९५ जागांवर विजयी होईल, असा विश्वास काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी आज व्यक्त केला. खर्गे यांच्या निवासस्थानी इंडिया आघाडीच्या नेत्यांची बैठक संपल्यावर ते वार्ताहरांशी बोलत होते. मतमोजणीच्या दिवशी विरोधी पक्षांनी काय काळजी घ्यावी, लोकसभा

निवडणूक आणि संभाव्य आव्हानांविषयी या बैठकीत चर्चा झाल्याचं, खर्गे यांनी सांगितलं.

**इंडिया आघाडी विजयी** होणार असून एक मजबूत सरकार स्थापन करणार असल्याचा विश्वास दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल आणि माकपचे सरचिटणीस सीताराम येचुरी यांनी व्यक्त केला. तर महाराष्ट्रात इंडिया आघाडीला ३० ते ३५ जागा मिळतील, असा विश्वास शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते अनिल देसाई यांनी व्यक्त केला. या बैठकीला  काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी, ज्येष्ठ नेते शरद पवार, अखिलेश यादव, तेजस्वी यादव, चंपई सोरेन, फारुख अब्दुल्ला  उपस्थित होते.

**<><><><><>**

लोकसभा निवडणूकीत आपल्या पक्षाला ३७० हून अधिक जागा मिळतील तसंच राष्ट्रीय लोकशाही आघाडीला ४०० हुन अधिक जागा मिळतील असा विश्वास भाजपा अध्यक्ष जे पी नड्डा यांनी व्यक्त केला आहे.  देशातली जनता तुष्टीकरण, वशिलेबाजी आणि भ्रष्टाचारावर आधारित राजकारणाला नाकारून बलशाली, विकसित आणि स्वावलंबी भारताच्या उभारणीला पाठिंबा देईल असं ते म्हणाले. भाजपा कार्यकर्ते आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील घटक पक्षांच्या कठोर मेहनतीबद्दल नड्डा यांनी त्यांची प्रशंसा केली आहे.

**<><><><><>**

आचारसंहितेचा भंग केल्याप्रकरणी उस्मानाबाद लोकसभा मतदारसंघातल्या महायुतीच्या उमेदवार अर्चना राणाजगजीतसिंह पाटील यांविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. पाटील यांनी उमेदवारी अर्ज दाखल करताना १९ एप्रिलला काढलेल्या रॅलीनंतर घेतलेली सभा विनापरवानगी घेतल्यामुळे हा गुन्हा दाखल झाला आहे.

**<><><><>**

काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ कार्यकर्ते आणि नाशिक जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे संचालक ऍडव्होकेट संदीप गुळवे यांनी आज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला. संदीप गुळवे महापालिका शिक्षण मंडळाचे सदस्य होते तसंच त्यांनी नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचं संचालक पदही भूषवले आहे. आज त्यांच्या पक्ष प्रवेशावेळी खासदार संजय राऊत यांच्यासह इतर नेते तसंच नाशिकचे जिल्हाध्यक्ष सुधाकर बडगुजर आणि शिक्षक संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

**<><><><>**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेतली जाणारी बारावीची पुरवणी परीक्षा १६ जुलै ते आठ ऑगस्ट तर दहावीची पुरवणी परीक्षा १६ ते ३० जुलै या कालावधीत होणार आहे. पुरवणी परीक्षांचं विषयनिहाय वेळापत्रक मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर सोमवारपासून उपलब्ध होईल.

**<><><><>**

जपान सरकारच्या टेक्निकल इंटर्न ट्रेनिंग प्रोग्रॅम अंतर्गत राज्यातल्या निवडक विद्यार्थ्यांना तीन ते पाच वर्षांकरिता जपानमध्ये ऑन द जॉब कौशल्य प्रशिक्षण दिले जाणार आहे. या विद्यार्थ्यांची पहिली तुकडी येत्या जून महिन्यात जपानला जाणार असल्याची माहिती जपानचे मुंबईतील नवनियुक्त कॉन्सल जनरल यागी कोजी यांनी दिली. गेल्या महिन्यात मुंबईतल्या वाणिज्य दूतावासाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर यागी कोजी यांनी काल राज्यपाल रमेश बैस यांची मुंबईतल्या राजभवनात सदिच्छा भेट घेतली, त्यावेळी ते बोलत होते.

<><><><><>

पनवेलमध्ये अभिनेता सलमान खानच्या कारवर हल्ला करण्याचा कट रचणाऱ्या चौघांना नवी मुंबई पोलिसांनी अटक केली आहे.  या चौघांना सलमान खानच्या पनवेल इथल्या फार्म हाऊसजवळ अटक करून त्यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. हे चौघेही रात्री उशिरा टेहळणी करत होते. पोलिसांना मिळालेल्या माहितीनुसार ही कारवाई केल्याची माहिती आमच्या बातमीदारानं दिली आहे.

<><><><><>

शेतकर्यांची  फसवणूक टाळण्यासाठी आणि त्यांना बी-बियाणं,  खतं, कीटकनाशकं यांचा योग्य दर्जाचा पुरवठा होण्यासाठी राज्यभरात निविष्ठांच्या तपासणीची धडक मोहीम हाती घेतल्याची माहिती पुणे कृषी संचालक विकास पाटील यांनी दिली. यासाठी राज्यभरात 350 भरारी पथकं कार्यान्वित केल्याचंही त्यांनी सांगितलं. 36 हजार नमुने घेण्याचं उद्दिष्ट दिलं असून अप्रमाणित नमुन्यांप्रकरणी कडक कारवाई करणार असल्याचं त्यांनी सांगितलं. बियाणांचे 20 हजार, खतांचे 10 हजार आणि कीटकनाशकांचे सहा हजार नमुने तपासण्याचं उद्दिष्ट निश्चित करून काम सुरू झालं आहे. अनुदानित युरिया खताचा गैरवापर औद्योगिक कारणास्तव होऊ नये म्हणूनही उपाययोजना केल्या जात असून युरियाच्या सर्वोच्च 20 खरेदीदारांची तपासणीही क्षेत्रीय स्तरावर करण्याच्या सूचना दिल्याची माहिती पाटील यांनी दिली.

<><><><><>

यंदाच्या खरीप हंगामासाठी धुळे जिल्ह्यात विविध पिकांच्या एकूण २७ हजार २४५ क्विंटल बियाणांची मागणी नोंदवली गेली आहे. जिल्हा कृषी प्रशासनानं ही माहिती दिली. कापूस, मका, बाजरी, ज्वारी या प्रमुख पिकांसह इतर पिकांसाठी ही

मागणी नोंदवली गेली आहे. मागणीनुसार जिल्हाभर पुरेसे बियाणं उपलब्ध आहे, आत्तापर्यंत १९ हजार ५३३ क्विंटल बियाणांचा पुरवठा केला आहे, तर उर्वरीत पुरवठा सुरु असल्याचंही प्रशासनानं कळवलं आहे. शेतकर्यांनी  अफवांना बळी पडू ज्यादा दरानं बियाणं खरेदी करु नये, तसंच कापसाच्या ठराविक वाणांचा आग्रह धरु नयं असं आवाहनही प्रशासनानं केलेलं आहे.

**<><><><><>**

राज्यातील शेतकरी दुष्काळात होरपळत असताना सरकार आणि प्रशासन मात्र स्वतःच्या दुनियेत व्यग्र आहे. विदर्भ आणि मराठवाड्यातल्या शेतकऱ्यांना सरकारकडून अजून कोणतीही मदत मिळालेली नाही, असा आरोप करत या दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळवून देण्यासाठी काँग्रेसनं नेमलेल्या समितीची आज बैठक पार पडली. विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी या प्रसंगी सरकारवर खरमरीत टीका करत सरकारला धारेवर धरले आहे. विदर्भात ५ जून पासून ही समिती पाहणी दौरा करणार आहे.

**<><><><><>**

एस टीचा  ७६ वा  वर्धापनदिन आज राज्यभरातल्या सर्व बस स्थानकांवर मोठ्या उत्साहात साजरा झाला. एसटीचे अधिकारी आणि कर्मचारी यांनी यानिमित्तानं बसेसची सजावट करून प्रवाशांचं स्वागत केलं. १ जून १९४८ रोजी पुणे ते अहमदनगर मार्गावर एसटीची पहिली बस धावली होती. आज ७६ वर्षांमध्ये १५ हजार बसेसपर्यंत एसटीचा विस्तार झाला आहे. दररोज सरासरी ५५ लाख प्रवासी एसटीतून प्रवास करतात.

चाकरमान्यांना दररोज पुण्याहून मुंबईला ने आण करणाऱ्या डेक्कन क्वीन या रेल्वेगाडीचा ९५ वा वाढदिवस आज सकाळी पुण्यामध्ये मोठ्या थाटात साजरा झाला. मात्र मेगाब्लॉकमुळे आज गाडीचा प्रवास होऊ शकला नाही.

<><><><><>

केरळमध्ये दाखल झाल्यानंतर नैर्ऋत्य मोसमी पावसाच्या पुढील वाटचालीसाठी अरबी समुद्रात पोषक वातावरण तयार झालं असल्यानं येत्या आठवडाभरात मोसमी पाऊस पश्चिम महाराष्ट्रासह राज्याच्या विविध भागात दाखल होईल, असा अंदाज हवामानशास्त्र विभागानं वर्तवला आहे.

येत्या दोन दिवसांत कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता असून तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची शक्यता हवामान शास्त्र विभागानं व्यक्त केली आहे. या काळात कोकणात उष्ण आणि दमट हवामान राहण्याचा अंदाजही वर्तवण्यात आला आहे.

//<><><><><>//